# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.11.2025** **वारःशनिवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज छत्तीसगडच्या दौऱ्यावर; 14 हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार
2. देशाला कमकुवत करणाऱ्या विचारांना, कृतीला नाकारणे, ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. सागरी सुरक्षा ही भारत-आसियान सहभागाचा केंद्रबिंदू-संरक्षण मंत्री
4. 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान' या मोहिमेअंतर्गत भारताचे तीन गिनीज विश्व विक्रम आणि
5. हायलो खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या उन्नती हुड्डाची महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक

**पंतप्रधान**

छत्तीसगड राज्य स्थापनेला 25 वर्ष पूर्णझाल्यानिमित्त आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते छत्तीसगडमध्ये 14 हजार 260 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी केली जाणार आहे. पंतप्रधान आज छत्तीसगडला भेट देणार असून नवा रायपूर अटलनगर इथल्या छत्तीसगड विधानसभेच्या नव्या इमारतीचं उद्धाटन आणि माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचं अनावरणही मोदी यांच्या हस्ते होणार आहे. हरित इमारत संकल्पनेवर बांधलेली ही रचना सौरऊर्जेवर चालण्यासाठी तयार केली असून त्यात पावसाचं पाणी साठवण्याच्या व्यवस्थेचाही समावेश आहे.

**पटेल जयंती**

प्रत्येक नागरिकानं देशाला कमकुवत करणाऱ्या विचारांना, कृतीला नाकारायला हवं, ही काळाची गरज आहे-असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विकसित भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी देशाच्या प्रगतीकरिता प्रत्येक नागरिकानं देशाप्रती समर्पण वृत्ती ठेवावी, असं आवाहन त्यानी केलं. भारताचे लोहपुरूष, पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त गुजरातमधील एकता नगर इथे आयोजित राष्ट्रीय एकता दिंन समारंभाला संबोधित करताना मोदी बोलत होते. यावेळी आयोजित एकता दिन संचलनामध्ये सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलिस दल, आणि विविध राज्यातील पोलीस दल तसंच विविधतेतून एकता या संकल्पनेवर आधारित चित्ररथही सहभागी झाले होते. इतिहास आणि संस्कृतीचं दर्शन घडविणारा महाराष्ट्राचा चित्ररथ विशेष लक्षवेधी ठरला. सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त देशभर एकता दौड आयोजित करण्यात आली होती.

**राजनाथ**

आसियान संघटना आणि भारतानं वेगवान आर्थिक विकास केला असून सागरी सुरक्षा ही भारत-आसियान सहभागाचा केंद्रबिंदू असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. सागरी मार्ग सुरक्षित करणे हे देशाचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं सांगत भारताचा अर्ध्याहून अधिक व्यापार हा दक्षिण चीन समुद्र आणि मलाक्का सामुद्रधुनीतून जात असल्याचं त्यांनी सांगितलं. संरक्षण मंत्र्यांनी काल दुसऱ्या आसियान-भारत संरक्षण मंत्र्यांच्या अनौपचारिक बैठकीत भाग घेतला. आजच्या अनिश्चित जगात, आसियान-भारत संबंध स्थिरतेचा एक मजबूत आधारस्तंभ आहेत असं या प्रसंगी बोलताना त्यांनी अधोरेखित केलं. दरम्यान राजनाथ सिंग आज मलेशियातील क्वालालंपूर इथे 12 व्या आसियान संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत सहभागी होणार आहेत.

**जशयंकर**

भारत-इंग्लंड संबंध एका गुंतागुंतीच्या ऐतिहासिक संबंधापासून गतिमान आणि भविष्यकालीन भागीदारीमध्ये विकसित झाले असल्याचं परराष्ट्रमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. काल नवी दिल्लीमध्ये यूके राष्ट्रीय दिन समारंभात ते बोलत होते. दोन्ही देश कनेक्टिव्हिटी, एआय आणि महत्त्वपूर्ण खनिजांच्या बाबतीतही एकमेकांना आवश्यक ते सहकार्य करतअसल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**लष्करप्रमुख**

पारंपारिक स्पर्धा, दहशतवाद आणि छुपे युद्ध, तसंच चुकीची माहिती पसरवणं ही आजच्या काळातील मोठं आव्हान असल्याचं लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत राष्ट्रीय सुरक्षेकरता युवकांना सक्षम करण्यासाठी आयोजित 'यंग लीडर्स फोरमला' संबोधित ते बोलत होते. आव्हानांच्या या युगात, राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रनिर्माण हे अविभाज्य आहेत. जागतिक स्तरावर जोडली गेलेली आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक असलेली आजची नवी पिढी या नव्या युद्धक्षेत्रामध्ये केंद्रस्थानी असल्याचं द्विवेदी यांनी यावेळी सांगितलं.

**नौदल-त्रिशूल**

ऑपरेशन सिंदूर अद्याप संपलेलं नसून भारतीय नौदल प्रभावीपणे तैनात असल्याचं नौदलाचे उपप्रमुख व्हाइस ॲडमिरल वात्सायन यांनी म्हटलं आहे. भारतीय नौदल हिंद महासागर क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक चिनी जहाजावर आपण लक्ष ठेवून आहोत असं त्यानी सांगितलं. फेब्रुवारी 2026 मध्ये विशाखापट्टणम इथे होणाऱ्या आगामी आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्ह्यू आणि मिलान सरावाबद्दल वात्सायन यांनी

माध्यमांना माहिती दिली. अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांनी या आंतरराष्ट्रीय नौदल सरावात सहभागी होण्याची पुष्टी केली आहे. दरम्यान, पाकिस्तानलगतच्या भारताच्या पश्चिम सीमेवर त्रिशूल हा बहू आयामी त्रि-सेवा सराव सुरू असल्याची माहिती नौदल कार्यवाही महासंचालक व्हाइस अ‍ॅडमिरल एएन प्रमोद यांनी दिली आहे. भारतीय लष्कराची दक्षिण कमांड, भारतीय नौदलाची पश्चिम कमांड, हवाई दलाची दक्षिण-पश्चिम हवाई कमांड, तसंच तटरक्षक दल, बीएसएफ आणि अन्य केंद्रीय संस्था त्रिशूल सरावात सहभागी झाल्या आहेत. नौदल 25 नौदल युद्धनौका तर हवाई दल 40 लढाऊ विमानांसह यामध्ये सहभागी होणार आहेत. 13 तारखेपर्यंत चालणाऱ्या या सरावाचा उद्देश सर्व सागरी दलांसह विविध आंतर-सेवा दलांमधील समन्वय वाढवणे हा आहे.

**बिहार निवडणूक**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाची तारीख आता जवळ येत असून राज्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. पहिल्या टप्प्यात 18 जिल्ह्यातील 121 जागांसाठी सहा नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**केरळ स्थापना दिवस**

केरळ राज्याचा आज स्थापना दिवस आहे. 1956 मध्ये याच दिवशी त्रावणकोर, कोचीन आणि मालाबारच्या विलिनीकरणानंतर केरळ राज्याची निर्मिती झाली होती. या निमित्तानं केरळमध्ये विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून राज्य विधानसभेचं आज विशेष सत्र बोलावण्यात आलं आहे.

**UIDAI**

UIDAI अर्थात भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने एआय, ब्लॉकचेन, क्वांटम संगणन आणि प्रगत एन्क्रिप्शनद्वारे भविष्यातील डिजिटल ओळख मजबूत करण्यासाठी 'आधार व्हिजन 2032' कार्यक्रम जारी केला आहे. हा कार्यक्रम भारताच्या डिजिटल ओळख परिसंस्थेच्या आगामी दशकातल्या पुढील पिढीच्या डिजिटल प्रशासनाला गती देण्यासाठी एक व्यापक मार्गदर्शक ठरेल असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने म्हटलं आहे. आधारच्या डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा आणि जागतिक सायबर सुरक्षा मानकांच्या पालनाच्या खात्रीकरता तंत्रज्ञान तज्ञांच्या उच्च-स्तरीय समितीनं हा कार्यक्रम विकसित केला आहे. तांत्रिक कौशल्य टिकवून आधारची सुरक्षित, समावेशक आणि लोक-केंद्रित डिजिटल ओळख वाढवणे असा याचा उद्देश आहे.

**गिनीज रेकॉर्ड**

'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान' या मोहिमेअंतर्गत भारताने तीन गिनीज विश्व विक्रम केले आहेत. 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर दरम्यान झालेल्या या मोहिमेत लोकांचा अभूतपूर्व असा सहभाग दिसून आला. या उपक्रमाने अनेक विक्रम प्रस्थापित केलेअसून एकाच महिन्यात सर्वाधिक 3 कोटी 21 लाख लोकांची आरोग्य सेवा नोंदणी या अभियानात झाली आहे.

**आरोग्य-नॉर्वे**

केंद्रीय आरोग्य सचिव पुण्य सलिला श्रीवास्तव यांनी काल नवी दिल्ली इथे नॉर्वे इंडिया पार्टनरशिप इनिशिएटिव्ह, NIPI च्या वार्षिक बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं आणि नॉर्वेच्या भारतातील राजदूत मे-एलिन स्टेनर यांच्यासोबत संवाद साधला. याप्रसंगी श्रीवास्तव यांनी या उपक्रमातून प्रयत्नांचं एकत्रीकरण काय साध्य करू शकतं हे दिसून येत असल्याचं सांगितलं. भारत सरकारने या उपक्रमांतर्गत नॉर्वेने खर्च केलेल्या रकमेच्या 26 पट गुंतवणूक केली आहे, हे या सहकार्याला भारताने दिलेलं महत्त्व असल्याचं स्टेनर यांनी अधोरेखित केलं. 2006 मध्ये ही भागीदारी सुरू झाल्यापासून भारतातील आरोग्य क्षेत्रात लक्षणीय विकास झाला आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**बॅडमिंटन**

जर्मनीमध्ये सुरू असलेल्या हायलो ओपन सुपर 500 बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या उन्नती हुड्डा ने महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली. उन्नतीने उप-उपांत्य फेरीत चौथ्यामानांकित चायनीज तैपेईच्या लिन हसियांग-ती हिचा 22-20, 21-13 असापराभव केला. आता अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी तिचा सामना अव्वल मानांकित असलेल्या इंडोनेशियच्या कुसुमा वर्दानीशी होईल. उन्नती ही अंतिम चारमध्ये पोहोचणारी एकमेवभारतीय बॅडमिंटनपटू आहे.

**क्रिकेट**

मेलबर्नमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या वीस षटकांच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताला 4 गडी राखून हरवलं. प्रथम फलंदाजी करताना अभिषेक शर्मा आणि हर्षित राणा वगळता बाकी भारतीय फलंदाज दुहेरी धावसंख्या गाठू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियानं हे आव्हान चौदाव्या षटकातच पार केलं. मालिकेतील तिसरा सामना उद्या होबार्ट इथं खेळला जाणार आहे. दरम्यान आय सी सी महिला विश्वचषक स्पर्धेचा अंतिम सामना उद्या भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात मुंबईत खेळला जाणार आहे.

# या बरोबरच हे बातमीपत्र संपलं. नमस्कार